# ....संरक्षण.....

कोणंद गावामध्ये एक सधन असे माळी कुटुंब रहाते. त्यांची खूप बागाइत शेती आहे. पूर्वी त्यांच्या शेतात गुऱ्हाळ चालायचे. आता महागाईमुळें मजुरांचा पगार परवडत नसल्यामुळें त्यांनी त्यांचा ऊस सातारा जवळील जरंडेश्वर साखर कारखान्यात घालायचे ठरविले. व त्या प्रमाणें त्यांनी ऊस घालणे चालू केले. ऊसाला चांगला भाव असल्याने माळी कुटूंब हल्ली ऊसाचेच पीक काढत असत. कृष्णा, रामा, सदाशिव, धोंडिबा त्यांची मुले व नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. सर्व जण सधन शेतकरी आहेत. यंदा त्यांना ऊसाच्या पिकाचे पौकाचे बील १५ लाख ७७ हजार रु. आले. त्याचा चेक आणण्यासाठी धोंडिबा कारखान्यात गेला होता. तसा त्यांना तिथें मान होता. त्यामुळें त्यांचे तिथे आदरातिथ्यही होत असे.

चेक घेऊन धोंडिबा रात्री सातारा इथे महालक्ष्मी ट्रेनमध्ये चढला. त्यानंतर भूक लागल्यामुळें सोबतची शिदोरी ५ भाकरीचो चवड व तुरीच्या डाळीची उसळ बघता बघता फस्त केली. उसळ तशी थोडी तिखटच असल्यामुळें त्यानें मध्येच पाण्याचा आधार घेतला. धोंडिबा गाडीत बसला खरा त्याच वेळेचच गाडी सुटली अन तिकीट चेकर पण चढलेला असल्यामुळें त्यानें धोंडिबाकडे तिकीट मागीतले. तिकीट वगैरे माझेकडे कांहीही नाही. मग आता दंडाचे ३२७ रु. दे. माझेकडे पैसे पण नाहीत. वाठार स्टेशनवर माझा मुलगा नरसु मला नेणेस येणार आहे. तो तुमचा दंड देईल. तो पर्यंत माझ्यावर दया करा साहेब. प्रत्येक स्टेशन आले कि, धोंडिबा गाडीत आहे कि नाही याकडे चेकरचे लक्ष होते. नीरा स्टेशनवर गाडी पाणी भरणेसाठी थांबली. गाडी बराच वेळ थांबल्यामूळें टी सी च्या सक्त पहारा त्याच्या वर होताच.

अखेर रात्री ३-३० वाजतां वाठार स्टेशन आले. अखेर खुळखुळ्याचा आवाज करीत नरसूची बैलगाडी त्याला नेणेसाठी आली. त्यामुळें धोंडिबाला हायसे वाटले. तिकीट चेकरने नरसूकडे दंडाचे पैसे मागितले. धोंडिबा म्हणाला कसले दंडाचे पैसे, त्यानें फेट्यातून तंबाखूच्या चंचीतून ठेवलेले तिकीट काढून तिकीट चेकरच्या हातात ठेवले. त्यामुळें तिकिट चेकर आश्चर्य चकीत होऊन म्हणाला अरे मग तिकीट आधीच का दिले नाहीस? धोंडिबा विनम्र पणे म्हणाला अहो साहेब माझेकडे मोठ्या रकमेचा चेक आहे. तो प्रवासात कुणी मारला तर काय करु. मी तुमच्या नजर कैदेत राहून इथपर्यंत सुखरूप आलो. त्या बद्दल मी तुमचा आभारी आहे. कारण तुमचे मला भक्कम संरक्षण मिळाले असे म्हणत दोघ बाप-लेक आनंदात घराकडे मार्गस्थ झाले.



श्री. रामचंद्र विश्वनाथ करपरकर
'वृंदावन' डी सेक्टर सी सिक्स
मो. क्र. ९४२११८३४०७